अग्रलेखांचा नवा काल बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काल

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काल बादशहा

# आपले लष्करच डेंजर झोनमध्ये

शेजारचा चीन जगातली दुसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. अगदी अमेरिकेप्रमाणे शस्त्र आणि संपत्ती या दोन्ही आघाड्यांवर चीनची घौडदौड सुरू आहे. आज जगातली आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारताची चीनबरोबर कोणत्याच बाबतीत तुलना होऊ शकत नाही किंवा चीनप्रमाणे एकाही क्षेत्रात भारत सक्षम असल्याचे दिसून येत नाही हे चित्र इतके स्पष्ट असताना भारत आपल्या लष्करी बळाबाबतही किती कमकुवत आहे, हे सांगणारी माहितीही समोर आली आहे. १९६२च्या चीनबरोबरच्या युध्दात भारताने एवढा सपाटून मार का खाल्ला याचा गौप्यस्फोट करणारा हॅन्डरसन ब्रूक यांचा अहवालही याच काळात प्रसिध्द व्हावा, या सगळ्या गोष्टींचा एकत्रितपणे विचार केला तर भारताने स्वत:च्याच संरक्षणाचे स्वत:पुढेच आव्हान निर्माण करून ठेवल्याचे स्पष्ट होते. आज भारताचे चीनला कोणत्याच बाबतीत आव्हान वाटत नाही. जवळपास सर्व बाबतीत तो सिध्द आहे. अलीकडेच प्रसिध्द झालेली बातमी इतकी धक्कादायक ठरते की, भारताच्या सैन्यदलाचे दारिद्र्यच जगासमोर मांडले गेले. भारतीय लष्कराकडे पुरेसा शस्त्रसाठा नसल्याचे सविस्तर वर्णन त्यात आहे. आज जर का कोणत्याही देशाबरोबर भारताचे युध्द छेडले गेले तर केवळ २० दिवस पुरेल एवढाच स्फोटकाचा साठा शिल्लक आहे. याबाबत भारताचे लष्करप्रमुख विक्रमसिंग यांनी देखील दुजोरा दिला आहे. एक कोटी १८ लाखाचे सैन्यबळ असलेल्या लष्कराकडे जर पुरेसा शस्त्र किंवा स्फोटकांचा साठा नसेल तर एवढे प्रचंड मनुष्यबळ असलेल्या लष्कराचा अपमान तर आहेच; त्यापेक्षाही एवढ्या मोठ्या लष्कराचे नैतिक खच्चीकरणच म्हणायला हवे. एकूणच बदलत्या जागतिक परिस्थितीत जिथे प्राथमिक गरजाही पूर्ण होताना दिसत नाहीत. हा प्रकार केवळ लष्कराबाबत होतो असेही नाही. जवळपास तिन्ही दलांच्या शस्त्रसज्जतेबाबत आज प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतासारख्या सव्वाशे कोटी लोकसंख्या आणि लाखो चौरस मीटर क्षेत्रफळाने व्यापलेल्या देशाला सर्वच आघाड्यांवर अतिशय सुसज्ज राहाणे आवश्यक आहे. लष्कराकडे केवळ २० दिवस पुरेल एवढीच सामुग्री शिल्लक राहावी ही बाब अत्यंत चिंताजनक ठरते. लष्करानेसुध्दा एवढी आणीबाणीची वेळ येईपर्यंत स्वस्थ का बसावे. नियम आणि संकेताप्रमाणे लष्कराकडे ४० दिवसांचा राखीव साठा असावा लागतो. त्याची मोजणी करताना तो जेव्हा ३९ दिवसांवर आला त्याचवेळी लष्कर प्रमुखांनी सरकार किंवा संरक्षण मंत्रालयाचे कान उपटायला हवे होते. अगदी ती परिस्थिती वीस दिवसावर येण्याची वाट कशाला बघावी. कदाचित, आता अनेकवेळा मागणी करूनही सरकारने तिकडे लक्ष दिले नसावे आणि शेवटी मग त्याची बातमी करून सरकारला जागे करण्याचा प्रयत्न लष्कराने केलेला दिसतो. परंतु हा सगळाच प्रकार देशाच्या सुरक्षिततेशी, संरक्षणाशी खेळखंडोबा करणारा आहे. आता तर लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना देशाच्या सुरक्षेपेक्षा स्वत:ची सत्ता टिकवण्याची जास्त चिंता आहे.

### इतिहासापासून कोणताच धडा नाही

इतिहासापासून धडा घेणे आपल्या देशाच्या सत्ताधाऱ्यांना मान्य नाही. असेच म्हणणे भाग पडते. देशाच्या संरक्षणाबाबत भारताला इतक्यावेळा ठेचा खाव्या लागल्या आहेत की, त्याच त्या चुका पुन्हा पुन्हा केल्या जात आहेत. मग ते चीनबरोबरचे १९६२ चे युध्द असो किंवा १९७२ चे पाकिस्तानबरोबरचे युध्द असो किंवा अलीकडे झालेले कारगील युध्द असो, आपली संरक्षण सिध्दता जागतिक दर्जाची नाही हे तीनही वेळा अगदी पुराव्यानिशी सिध्द झाले आहे. गेली अनेक वर्षे टॉप सिक्रेट म्हणून दडपून ठेवलेला हॅंडरसन ब्रूक यांचा १९६२ च्या चीन युध्दाबाबतचा अहवाल नुकताच फुटला त्यात पंडित नेहरूंना जबाबदार धरण्यापासून ते भारताचे लष्करी बळ किती दुर्बल होते, याचे सविस्तर वर्णन त्यात केले गेले आहे. प्रामुख्याने युध्दकाळात ज्या चाणाक्ष नियोजनाची दूरदृष्टीची गरज असते तीच भारतीय सैन्य दलाकडे नव्हती. एकमेकांमधला सुसंवाद नव्हता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अपुरा अर्धवट आणि जुनाट शस्त्रसाठा हे त्या पराभवाचे प्रमुख कारण असल्याचे हॅंडरसन यांनी त्यात निदर्शनास आणून दिले आहे. इतका पराकोटीचा हलगर्जीपणा किंवा संरक्षण सिध्दतेबाबतची कमालीची उदासीनता असेल तर विजय मिळणे तर दूरच राहिले. पण युध्दकाळात टिकून राहणेसुध्दा शक्य नाही. अशा उदासीनतेमुळे आपण पराभवाला आमंत्रण देतो. संकटांना संधी देतो, असे हे धोरण म्हणजे शत्रूला देशाचे संरक्षण स्वत:च आंदण देण्यासारखे ठरते.

### सैन्यच असुरक्षित

एकीकडे सैन्य दलाचे आधुनिकीकरण करण्याची गरज आहे असे म्हणायचे परंतु प्रत्यक्षात त्यासाठी आवश्यक त्या निधीची व्यवस्था करायची नाही असा दुटप्पीपणा सरकारी पातळीवर सुरू आहे. आतासुध्दा लष्कराकडे २० दिवस पुरेल एवढीच सामुग्री आहे. ती पुरेशी वाढवायची असेल तर ताबडतोब दहा हजार कोटींची गरज आहे आणि २०१९ पर्यंत लष्कराकडे शंभर टक्के साठा असावा असे वाटत असेल तर त्याकरीता १९ हजार २५० कोटींची तरतूद सरकारने केली पाहिजे. ही तयारी नसल्यामुळेच लष्कराला त्याचा मोठा फटका बसतो आहे असे म्हणतात की भारतीय लष्कराच्या इतिहासात आतापर्यंत एवढा मोठा तुटवडा कधीही निर्माण झाला नव्हता. या टंचाईचा लष्कराच्या सज्जतेवर परिणाम झाला आहे. परंतु ज्या प्रशिक्षणासाठी सामुग्री,स्फोटके वापरावी लागतात त्यावरसुध्दा परिणाम झाला आहे. सध्या लष्कराने ३८२ नव्या बटालियन तयार करण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. २८१ आर्टिलरी ६३ सशस्त्र, ४४ मेकॅनिकल आणि ५६ एअर डिफेन्स आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, लष्करापुढे कोणतीही अत्याधुनिक सामुग्री दाखल झालेली नाही. ज्याची जगातल्या बड्या सैन्याशी तुलना करता येईल. देशात एकूण ३९ ऑर्डिनन्स फक्टरीज असूनही त्यांच्या पूर्ण क्षमतेचाही वापर केला जात नसल्याचे दिसून आले आहे. तीन स्तरावर ही लष्करी सिध्दता ठेवावी लागते. तशी ती आज जय्यत स्वरुपाची नाही.तोच प्रकार नौदलाचाही आहे. नौदलाच्या १३ पाणबुड्यांना ८ महिन्यांत जलसमाधी मिळण्याचा प्रकार म्हणजेच नौदल आधुनिकतेने सुसज्ज नाही हेच दाखवणारा ठरतो. या कारणावरूनच नौदल प्रमुखांना थेट राजीनामा द्यावा लागला आहे. हवाई दलाची थोड्याफार फरकाने हीच अवस्था आहे. पाकिस्तानाच्या कुरापती, चीनचा वाढता प्रभाव अफगाणिस्तानातल्या तालिबान्यांची दहशत श्रीलंकेची चीनबरोबरची वाढणारी दोस्ती बांगला देश व नेपाळ या देशांमधला अस्थिर परिस्थितीचा भार भारताला सहन करावा लागतो आहे. आपला सीमावर्ती भाग सुरक्षित नाही ही आज वस्तुस्थिती आहे. युध्दाचा धोका पत्करण्याइतकी सिध्दता आपल्याकडे असणे वेगळे आणि आपण किती पाण्यात आहोत किती जमिनीवर आहोत आणि किती आहोत याचे आत्मभान असणे वेगळे आहे. भारतीय लष्कराने शत्रूमध्ये थरकाप उडवावा ही अपेक्षा ठेवणे योग्य असली तरी सध्या आपलेच लष्कर डेंजर झोनमध्ये आहे, हे सत्य स्वीकारण्याशिवाय आपल्याला पर्याय नाही.